PARLE **MAHOTSAV**

Organiser - **ADV. PARAG ALAVANI,** President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahostav.com

PARLE **MAHOTSAV**

**<u>कृपया प्रसिध्दीसाठी</u>**

# खिलाडूवृत्ती प्रत्येक माणसाच्या जीवनात असली पाहिजे- रामदास आठवले

मुंबई दि.२८ : मी सुध्दा शालेय जीवनात खो-खो, क्रिकेट हे खेळ खेळलो त्यामुळेच खिलाडूवृत्ती माझ्या अंगी बाणली आणि त्याचा उपयोग मला आज राजकारणात ही होत आहे. ही खिलाडूवृत्ती प्रत्येक माणसाच्या जीवनात असली पाहिजे, असा संदेश आर.पी. आय चे राष्ट्रीय अध्यक्ष श्री. रामदास आठवले यांनी १३ व्या पार्ले महोत्सवाच्या व्यासपीठावर दिला. १३ व्या पार्ले महोत्सवाच्या सहाव्या दिवशी प्रमुख पाहुणे या नात्याने रामदास आठवले यांनी उपस्थित सर्व स्पर्धकांशी संवाद साधला.

ॲड.पराग अळवणी आणि नगरसेविका सौ. ज्योती अळवणी यांनी कलाकार व खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी पार्ले महोत्सवाच्या आयोजनाची परंपरा गेले १३ वर्षे यशस्वीरीत्या चालवली आहे, ही बाब कौतुकास्पद आहे, असे गौरोद्गारही आठवलेजी यांनी काढले. पार्ले महोत्सवात यंदा प्रथमच घेण्यात आलेल्या 'भारत को जानो' या सामान्यज्ञानाचा कस लावणाऱ्या प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजनही करण्यात आले असुन १०० हून अधिक स्पर्धकांनी यात सहभाग घेतला. तसेच आत्तापर्यंत नृत्य स्पर्धत २०० हून अधिक स्पर्धकांनी तर समूह नृत्य स्पर्धेत ५०० हून अधिक संघानी सहभाग नोंदवला आहे.

अनेक राष्ट्रीय व आतंरराष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंचा सहभाग १३ व्या पार्ले महोत्सवाचे आकर्षण ठरले. या खेळडूंचा प्रत्यक्ष खेळ पाहण्यासाठी प्रेक्षकींनीही आत्तापर्यत्त लोखोंच्या संख्येने उपस्थिती पार्ले महोत्सवात दर्शविली आहे. वॉली बॉलमध्ये छत्रपती शिवाजी पुरस्कार विजेते दिनकर देशपांडे, आंतरराष्ट्रीय खेळाडू अभय कुरवे, राष्ट्रीय खेळाडू दिग्विजय पांचरे, तोहिद यांनी सहभाग घेतला तर खो-खो मध्ये एकलव्य पुरस्कार विजेता गणेश सावंत, अभिमन्यू पुरस्कार विजेता दिपेश मोरे या राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंनी आपला खेळ सादर केला तसेच कबड्डीमध्ये राष्ट्रीय खेळाडू अश्विनी महाडिक हीने ही भाग घेतला, अशी माहिती प्रमुख आयोजक ॲड.पराग अळवणी यांनी दिली.

———————————————————————————————

सदर पत्रक श्री.चरणजीत सिंग संधू, सहआयोजक पार्ले महोत्सव यांनी प्रसिध्द केले आहे.